**ठळक बातम्या**

- राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा

- मस्साजोग इथल्या सरपंचाच्या हत्येप्रकरणातल्या आरोपींना फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीसाठी आज बीड बंद

- अबु आझमी यांच्या निलंबनाच्या मागणीवरून विधीमंडळात गदारोळ, दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- कोकणात आजपासून शिमगोत्सवाला सुरुवात

**आणि**

- चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारताविरुद्धच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय

**<><><><><><>**

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी आपला राजीनामा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्याकडे सुपूर्द केला आहे. नैतिकतेला धरुन आणि तब्येत ठीक नसल्यानं राजीनामा दिल्याचं धनंजय मुंडे यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

मुंडे यांचा राजीनामा स्वीकारला असून पुढील कार्यवाहीसाठी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे पाठवला आहे असं फडनवीस यांनी विधानभवनात वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातले आरोपी मुंडे यांचे निकटवर्तीय असल्याचा आरोप

आहे. त्यामुळे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील आणि भाजपचे आमदार सुरेश धस यांनी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती.

धनंजय मुंडे यांनी या आधीच राजीनामा द्यायला हवा होता. त्यांनी शपथ घ्यायलाच नको होती अशी प्रतिक्रिया पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी नागपूर इथं वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केली.

**<><><><><><>**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या अतिशय क्रूरपणे करण्यात आली असून नैतिकता म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामे द्यावेत अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला म्हणजे झालं असं नाही, मुख्यमंत्र्यांनी त्यांना बडतर्फ का केलं नाही हा प्रश्न आहे, असं सपकाळ म्हणाले. सरकार मुंडेंना वाचवायचा प्रयत्न करत होतं असा आरोप सपकाळ यांनी केला.

**<><><><><><>**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातल्या आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे या मागणीसाठी आज बीड जिल्हा बंदचं आवाहन करण्यात आलं आहे. या बंदच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातल्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक परिसरात नागरिक, सर्वपक्षीय पदाधिकारी एकत्रित आले होते. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात गुन्हे अन्वेषण विभागानं न्यायालयात आरोपपत्र दाखल केलं आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून जनतेनं  कायदा हातात घेऊ नये, असं आवाहन पोलीस अधीक्षकांनी केलं आहे. जिल्ह्यात संवेदनशील ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

**<><><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशीचं कामकाज सत्ताधारी पक्षांच्या आमदारांच्या गदारोळानंतर दिवसभरासाठी

तहकूब करण्यात आलं. विधानसभेचं कामकाज सुरू झालं तेव्हा समाजवादी पार्टीचे आमदार अबु आझमी यांच्या राजीनाम्याची मागणी करत सत्ताधारी आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. आझमी यांनी मुघल शासक औरंगजेब याच्या समर्थनार्थ वक्तव्य केल्याचा आरोप करत सत्ताधारी आमदार महेश लांडगे, अतुल भातखळकर, गुलाबराव पाटील, सुधीर मुनगंटीवार यांनी केला. गदारोळ वाढल्यामुळे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब केलं होतं. कामकाज सुरू झाल्यानंतर उद्योग मंत्री उदय सामंत यांनीही आझमी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अबु आझमी हे देशद्रोही असून त्यांचं निलंबन करण्याची मागणी केली. आझमी यांनी वारंवार छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान केला आहे, असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट... एकनाथ शिंदे ....**

अबू आझमी यांच्या वक्तव्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेतही निवेदन केलं. यावर सरकारने कारवाई करावी असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिले. त्यानंतरही सत्ताधारी आमदारांनी घोषणाबाजी सुरू ठेवल्यानं सभापतींनी कामकाज १५ मिनिटांसाठी तहकूब केलं. कामकाज सुरू झाल्यावर काँग्रेसचे भाई जगताप यांनी प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांच्यावरही कठोर कारवाई करण्याची मागणी केली. महापुरुषांचा अवमान करणाऱ्या सर्वांवर कठोर कारवाई करावी असे निर्देश सभापती राम शिंदे यांनी सरकारला दिले. सत्ताधारी सदस्यांचं आंदोलन सुरूच असल्याने सभापतींनी कामकाज उद्यापर्यंत तहकूब केलं.

**<><><><><><>**

मुघल शासक औरंगजेबाचा बचाव करणारं वक्तव्य केल्याप्रकरणी समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि आमदार अबू आझमी यांच्याविरोधात एफआयआर दाखल

झाला आहे. नागरिकांच्या भावना दुखावल्या प्रकरणी मरीन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला आहे. विधानभवन परिसरात काल त्यांनी पत्रकारांशी बोलताना हे वक्तव्य केलं होतं. या वक्तव्यानंतर शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी ठाण्याच्या वागळे इस्टेट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. ही तक्रारही मरीन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात पाठवण्यात आली.

दरम्यान हे वक्तव्य मागे घेतल्याचं निवेदन अबु आजमी यांनी समाजमाध्यमांवर केलं आहे.

**<><><><><>**

मुंबई उच्च न्यायालयात आणखी ३ न्यायाधीशांच्या नियुक्तीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली आहे. शैलेश ब्रह्मे, फिरोज पुनावाला, जितेंद्र जैन यांची अतिरीक्त न्यायाधीश म्हणून कायमस्वरुपी नेमणूक झाली आहे. याशिवाय मंजूषा देशपांडे यांना आणखी वर्षभरासाठी अतिरीक्त न्यायाधीश म्हणून नेमायला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली आहे.

**<><><><><>**

देशाला आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकार काम करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. अर्थसंकल्पानंतर सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रावर आयोजित वेबिनारमध्ये प्रधानमंत्री बोलत होते.
उत्पादन आणि निर्यातीबाबत अनेक महत्त्वाचे निर्णय सरकारनं घेतले असल्याचं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. गेल्या १० वर्षात भारतानं सातत्यानं सुधारणा, आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि समावेशक वृद्धी केली आहे. सातत्य आणि सुधारणांची हमी यामुळे उद्योगांमध्ये नवा आत्मविश्वास आल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशात उद्योग व्यवसायात सुलभता यावी यासाठी केंद्र सरकारनं केलेल्या विविध उपाययोजनांचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी आपल्या भाषणात केला. कोविडच्या काळात जागतिक पातळीवर आर्थिक मंदी जाणवली होती. परंतु सरकारनं केलेल्या

विविध उपाययोजनांमुळेच भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचा फारसा परिणाम जाणवला नाही. यामुळे भारताला वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनण्यास मदत झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी नमूद केलं. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये एमएसएमईचं महत्त्व प्रधानमंत्र्यांनी आवर्जून नमूद केलं. जागतिक पातळीवर ज्या वस्तूंना अधिक मागणी आहे, त्या पुरवण्याचा प्रयत्न करा जेणेकरून निर्यातीच्या क्षेत्रात भारत अग्रस्थानी असेल, असं आवाहन त्यांनी केलं. उत्पादनाशी संबंधित असलेल्या प्रोत्साहन योजनांमुळे १३ लाख कोटी रुपयांचं उत्पादन झालं असून १ लाख ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाल्याचंही प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

रत्नागिरी जिल्ह्यात आजपासून शिमगोत्सव सुरू झाला आहे. यानिमित्त १ हजार ३१५ सार्वजनिक तर २ हजार ८५४ खासगी होळ्या उभारल्या जाणार आहेत. ८ दिवसांनी प्रत्यक्ष होळी पेटवून झाल्यावर प्रत्येक गावाच्या ग्रामदैवताच्या उत्सवाला आणि ग्रामदैवतांच्या पालख्यांना सुरुवात होईल. यंदा पालख्यांची संख्या १ हजार ३९९ आहे.

<><><><><>

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज उपांत्य फेरीतला पहिला सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात दुबईत सुरू आहे.  ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

व्हेवज शिखर परिषदेत आयोजित  केलेल्या  कॉमिक्स क्रिएटर स्पर्धेचे उपांत्य फेरीतले विजेते निवडण्यासाठी पाच सदस्यीय ज्युरी पॅनलची घोषणा करण्यात आली आहे. या स्पर्धेत सर्जनशीलतेला मोठा वाव  आहे, असं या ज्युरींपैकी एक असलेले जजेल होमावजीर यांनी सांगितलं. भारतात कॉमिक्सची

बाजारपेठ किंवा वितरण प्रणाली नाही, या स्पर्धेमुळे कलाकारांना आपली कला बाजारपेठेत नेण्याची संधी निर्माण होईल, असं होमावजीर म्हणाले. या स्पर्धेसाठी फँटसी, साय फाय, भावनिक असे विविध विषय प्राप्त झाले आहेत, असं त्यांनी सांगितलं. कलाकारांनी आपली आवड जपावी असं आवाहनही होमावजीर यांनी केलं.

//<><><><><><>//